# ॥ हाचि निरोप गुरूंचा ॥

नाम सदा बोलावे, गावे भावे, जनांसि सांगावे ।
हाचि निरोप गुरूंचा, नामापरते न सत्य मानावे ॥१॥

नामांत रंगुनिया व्यवहारी सर्व भोग सेवावे ।
हाचि निरोप गुरूंचा, भोगासंगे कुठे न गुंतावे ॥२॥

आनंदांत असावे, आळस भय द्वेष दूर त्यागावे ।
हाचि निरोप गुरूंचा, अनुसंधाना कधी न चुकवावे ॥३॥

गोड सदा बोलावे, नम्रपणे सर्वलोकप्रिय व्हावे ।
हाचि निरोप गुरूंचा, भक्तीने रघुपतीस आळवावे ॥४॥

स्वांतर शुद्ध असावे, कपटाचरणा स्वयें न वश व्हावे ।
हाचि निरोप गुरूंचा, मन कोणाचे कधी न दुखवावे ॥५॥

माझा राम सखा, मी रामाचा दास, नित्य बोलावे ।
हाचि निरोप गुरूंचा, रामापाशी अनन्य वागावे ॥६॥

यत्न कसून करीन मी, यश दे, रामा, न दे, तुझी सत्ता ।
हाचि निरोप गुरूंचा, मानावा राम सर्वदा कर्ता ॥७॥

आचारसंयमाने युक्त असा नीतिधर्म पाळावा ।
हाचि निरोप गुरूंचा, खेळाऐसा प्रपंच मानावा ॥८॥

दाता राम सुखाचा, संसारा मान तू प्रभूसेवा ।
हाचि निरोप गुरूंचा, संतोषा सर्वदा मनी ठेवा ॥९॥

स्वार्थ खरा साधा रे, नित्य तुम्ही नामगायनी जागा ।
हाचि निरोप गुरूंचा, मीपण जाळोनिया जगी वागा ॥१०॥

अभिमान शत्रू मोठा, सर्वांना जाचतो सुखाशेने ।
हाचि निरोप गुरूंचा, मारावा तो समूळ नामाने ॥११॥

राज्याधिकार येवो, किंवा जावो समस्त धन मान ।
हाचि निरोप गुरूंचा, भंगावे ना कदा समाधान ॥१२॥

प्रेमांत राम रमतो, प्रेमाला मोल ना जगामाजी ।
हाचि निरोप गुरूंचा, गुरुरायाला तहान प्रेमाची ॥१३॥

॥ जानकीजीवनस्मरण जय जय राम ॥